# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक
दिनांक – २६ नोव्हेंबर २०१५

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दूरदृष्टिकोनातून साकारली भारतीय राज्यघटना

## मुंबई विद्यापीठात संविधान दिन उत्साहात साजरा

मुंबई - स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यावर आधारलेली भारतीय घटना ही भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दूरदृष्टिकोनातून साकारली असून संविधानाने समाजाभिमुख जगण्याचे जे तत्त्वज्ञान शिकविले आहे, ते सशक्त राष्ट्राच्या उभारणीसाठी महत्वाचे असून मानवतावादी दृष्टिकोन हे भारतीय संविधानामुळे प्राप्त झाले असल्याचे प्रतिपादन आज मुंबई विद्यापीठात पार पडलेल्या संविधान दिनाच्या कार्यक्रमात मान्यवारांनी व्यक्त केले.

मुंबई विद्यापीठाच्या विधी विभागाच्या वतीने **"भारतीय संविधानाची सरंचना- डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा दुरदृष्टिपणा"** या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विधी विभागाचे प्राध्यापक डॉ.दिलीप उके यांनी या विषयांवर उपस्थितांना मार्गदर्शन केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट उलगडून दाखवतांना त्यांना कोणत्या हाल अपेष्टा सहन कराव्या लागल्यात तसेच त्यांनी विपरीत परिस्थीतीवर मात कशी केली याचे अनेक उदाहरणे त्यांनी सांगितले.पुढे ते म्हणाले की,संविधानाच्या निर्मितीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अनेक प्रसंगाना समोर जावे लागले,त्यांना कितीतरी गोष्टींचा विरोध झाला मात्र त्यावरही त्यांनी यशस्वी मात केली,उदा. क्लास या शब्दाऐवजी बॅकवर्ड क्लास या शब्दासाठी झालेला विरोध अशा अनेक विरोधांना समोरे जात त्यांनी संविधानाची निर्मिती केली. भारतीय संविधानामध्ये राखीव प्रवर्गासाठी सोयी-सुविधेंसाठी कलमे,महिलांसाठी घटनेतील कलमे हे त्यांच्या दूरदृष्टिपणाची उत्तम उदाहरणे असल्याचे त्यांनी नमुद केले.तसेच गेल्या ६६ वर्षांत अनेक न्यायालयीन प्रकरणांचा त्यांनी उलगडा केला.

तर राज्यशास्त्र विभागाच्या वतीने **"भारतीय संविधान – संदर्भ आणि आव्हान"** या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.या राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर,डॉ.अरुण पटनाईक,डॉ.हरीश वानखेडे,सुधाकर गायकवाड,राजगोपाल देवरा,प्रा.झहीर अली,शमीन मोदी,महेश गावस्कर इत्यादी मान्यवर सहभागी झाले होते. या राष्ट्रिय चर्चासत्रामध्ये संविधान आणि आणि त्यातील मौलिक तत्त्वे, संवैधानिक हक्क आणि कर्तव्ये ,सार्वभौमत्व,स्वातंत्र्य आणि निर्भयता इत्यादी विषयांवर चर्चा करण्यात आली.या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर यांनी भारतीय राज्यघटना ही जागतिक दृष्टिकोनातून किती महत्वाची आहे हे नमुद केले.भारतीय घटनेनुसार निर्माण झालेले निवडणूक आयोग त्याची स्वायत्तता आणि त्याचे महत्व हे जागतिक पटलावर कसे महत्वाचे आहे,याची अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केले.जगातील अनेक लोकशाही राष्ट्रे कुचकामी ठरली आहेत,मात्र भारतीय संविधानाने पुरस्कृत असलेली भारतीय लोकशाही आजही जिवंत असून ते केवळ आपल्या सशक्त भारतीय घटनेमुळे शक्य झाल्याचे त्यांनी नमुद केले.

संविधानाने मानवतावादी दृष्टिकोन दिला असून, संविधान हे धर्मनिरपेक्ष आहे. विश्वाचे कल्याण संविधानात आहे. सुख, शांती, समाधान निर्माण करण्यासाठी समाजात संविधान संस्कृती निर्माण होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.संजय देशमुख यांनी व्यक्त केले.भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान निर्मितीमध्ये अमुल्य योगदान असून त्यांच्या दूरदृष्टिकोनातून आजचा भारत हा सशक्त भारत म्हणून उदयास येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त मुंबई विद्यापीठात अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून १२ व्याख्यान मालांचे नियोजन करण्यात आले आहे आणि लवकरच त्याची सुरुवात होणार असल्याचेही ते म्हणाले.

संविधान हे शिक्षित व अशिक्षिताने समजून घेणे गरजेचे आहे. समाजासाठी, देशासाठी आपली काय जबाबदारी आहे, हे जेव्हा आपल्या कृतीतून उतरते, त्यालाच खऱ्या अर्थाने संविधान स्वीकारले असे म्हणावे लागेल असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.एम.ए.खान यांनी केले.तर मुंबई विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या संविधान दिनाचे हे उपक्रम स्तूत्य असून भारताचे संविधान आणि आणि त्यातील मौलिक तत्त्वे, संवैधानिक हक्क आणि कर्तव्ये यांची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी म्हणून मुंबई विद्यापीठातर्फे २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन दरवर्षी साजरा करण्यात येईल असे मत बीसीयुडीचे संचालक डॉ.अनिल पाटील यांनी व्यक्त केले. विधी विभागाचे प्रमुख डॉ.अशोक येंडे यांनी भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातल्या अनेक घटनांचा अभ्यास करुन त्या-त्या देशातील घटनेतील मौलिक तत्वांचा भारतीय परीस्थीतीनुसार कसा अवलंब केला याचे अनेक उदाहरणे देऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची महती विशद केली. संविधान दिनाच्या निमित्ताने मुंबई विद्यापीठाच्या पाली विभागाच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनपटावर चित्र प्रदर्शनाचे आयोजन केले होते. विधी विभागातील प्राध्यापक स्वाती रौतेला यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले तर डॉ.श्रीधर मुंढे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)